| | | |
|---|---|---|
| MHKO160005262024 | दाखल तारीख | - २१/११/२०२४ |
| | नोंदणी तारीख | - २१/११/२०२४ |
| | निकाल तारीख | - ०३/०६/२०२६ |
| | कालावधी | - ०२ वर्षे ११ महिने १७ दिवस |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २२६/२०२४** **निशानी क्र.** ____

**भाग अ**

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(i) अन्वये )

**शाहूवाडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांचे न्यायालयात**

( पिठासिन अधिकारी - पी. बी. पवार यांचेसमोर )

न्यायनिर्णय घोषित – दिनांक ०३/०६/२०२६

( संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २२६/२०२४ )

गुन्हा नोंद क्र.- १७७/२०२३, शाहुवाडी पो. ठाणे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | :- | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पो. ठाणे,<br>ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | :- | सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. व्ही. चिमटे |
| आरोपी | :- | अरविंद दिनकर पोवार, व.व.५२, धंदा- व्यवसाय,<br>रा.-सुपात्रे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | :- | श्रीमती एस. एस. सपाटे |

## भाग ब

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १७/०६/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | १७/०६/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २९/०१/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | २९/०१/२०२५ |
| न्यायनिर्णसाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | ०३/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०३/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र | आरोपीचे नाव | अटक दिनांक | सी. आर. पी. सी. कलम ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अरविंद दिनकर पोवार | आरोपीस फौ.प्र.सं.कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस अदा. | | भा.दं.वि.सं.कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८५ प्रमाणे गुन्हा | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग क

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii) अन्वये )

### अ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | दगडू शिवाजी पाटील | घटनास्थळ पंचनामा पंच साक्षीदार | १४ |
| २ | शिवाजी बापू पाटील | फिर्यादी | १७ |
| ३ | दिपाली बाळू यादव | तपासी अधिकारी | २३ |

**<u>क न्यायालयातर्फे निशाणी -(फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)</u>**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | दोषारोपपत्र |
| २ | नि.१ सोबत | अटकेचे नमुने |
| ३ | नि.१ सोबत | निवेदन |
| ४ | १८ | फिर्याद |
| ५ | १९ | ब्रेथ ॲनालायझर रिपोर्ट |
| ६ | २४ | गुन्हा वर्ग केलेबाबत ठाणे अंमलदार यांचा आदेश |
| ७ | २५ | घटनास्थळ पंचनामा |
| ८ | २६ | आरोपीस कलम ४१अ प्रमाणे दिलेली नोटीस |
| ९ | २७ | आरोपीचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे जबाब |

## न्यायनिर्णय
## (घोषित दि. ०३/०६/२०२६)

१. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप ठेवून संपरिक्षित करण्यात आले आहे.

२. अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात अशी की, -

घटना ही दिनांक २८/०३/२०२३ रोजी १८.०० वाजणेचे सुमारास बांबवडे,

ता. शाहुवाडी गावचे हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ वर आंबीरा ओढ्याचे पुलावर घडली आहे. घटनेचे वेळी व ठिकाणी यातील घटनेतील मयत सदाशिव बाबुराव वारंगे, व.व.७०, रा. चरण, ता. शाहुवाडी हे आंबिरा ओढ्याचे पुलावरून पायी चालत रस्ता ओलांडत असताना आरोपी अरविंद दिनकर पोवार याने त्याचे ताबेतील हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्र.एम.एच.०९ए.एफ.९६७९ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे चालवून पायी चालत रस्ता क्रॉस करीत असलेले सदाशिव बाबुराव वारंगे यांना समोरून जोराची धडक देऊन अपघात केला. घटनेचे वेळी आरोपीने सदर मोटरसायकलचा विमा उतरविलेला नव्हता. सदर अपघातात सदाशिव बाबुराव वारंगे हे गंभीर जखमी झाले असता त्यांना उपचारासाठी सी.पी.आर. हॉस्पीटल, कोल्हापूर येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच ते मयत झाले. सदर घटनेनंतर सरकारतर्फे फिर्यादी श्री. चिंतामण सोमा बांबळे, तत्कालीन पो.हे.अं.७३, शाहूवाडी पो. ठाणे यांनी आरोपीविरूध्द फिर्याद दिलेली आहे.

३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरूध्द शाहूवाडी पो. ठाणे येथे गु.र.नं.१७७/२०२३ हा दाखल होवून त्याचा तपास श्री. एस. एन. सावंत, तत्कालीन पो.उ.नि.७३, शाहुवाडी पो. ठाणे यांचेकडे वर्ग झाला होता. तपासअधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जाबजबाब घेतले, तसेच घटनास्थळाचा पंचनामा केला, वैदयकीय कागदपत्रे प्राप्त करुन तपासाअंती आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४. यापूर्वी मी आरोपीविरूध्द निशानी ०७ येथे गुन्हयाचा तपसिल निश्चित केला आहे, आरोपीस तो तपशिल वाचून, समजावून सांगितला असता त्यांनी अपराधाची कबूली दिली नाही आणि संपरिक्षेची तयारी दर्शविली. तसेच आरोपीचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे जबाब नि.२३ वर नोंदविण्यात आलेला असून त्यामध्ये त्याचा बचाव नकारात्मक स्वरूपाचा दिसून आला व त्याने विचारलेल्या सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

५. अभियोग पक्षाचा खटला, अभिलेखावरील पुरावा यावरून माझे विचारार्थ खालील मुद्दे आले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपीने दिनांक १७.०६.२०२३ रोजी १९-०० ते २२-०० वाजणेचे दरम्यान, शाहुवाडी एस.टी. स्टँडसमोर, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथे त्याचे ताबेतील बजाज डिस्कव्हर वाहन क्र. एम.एच.०९सी.एन.९०४२ हे वाहन बेदरकारपणे, निष्काळजीपणे, स्वत:चे व इतरांचे जीवीतास धोका होईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनीक रस्त्यावर चालविले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता **कलम २७९** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| २ | आरोपी वर नमूद दिनांकी, वेळी व ठिकाणी त्याचे ताबेतील बजाज डिस्कव्हर वाहन क्र. एम.एच.०९सी.एन.९०४२ हे वाहन अंमली पदार्थाचे सेवन करून चालवित घेऊन जात असताना मिळून आला आणि त्याद्वारे मोटार वाहन कायदा **कलम १८५** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| ३ | आदेश काय | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

**कारणमिंमासा**

**मुददा क्र. १ ते ३ करीता -**

६. सदरकामी अभियोग पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ दगडू शिवाजी पाटील हे पंचनामा पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांचे जबाबात कथन केले की त्यांना पंचनामेकामी बोलावले नाही व त्यांचेसमक्ष

कोणतीही कारवाई झाली नाही. सदर साक्षीदाराने पंचनामेवरील अ.क्र.१ वरील त्याची सही नि.१५ ओळखली, मात्र त्यातील मजकूर माहित नसल्याचे कथन केले. सरकारी वकिलांचे उलटतपासात देखिल सदर साक्षीदाराने दि.१८/०६/२०२३ रोजी त्याला पंचनामेकामी बोलावलेची बाब पूर्णपणे नाकारली व पंचनामेबाबत विचारलेल्या सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

७. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ शिवाजी बापू पाटील हे फिर्यादी असून त्यांनी त्यांचे जबाबात कथन केले की ते सन २०२३ साली बांबवडे दुरक्षेत्र येथे जनरल डयुटी वर कार्यरत असताना सदर कालावधीत अपघाताचे प्रमाण वाढलेमुळे दुचाकी वाहनावर ड्रंक अँड ड्राईव्ह बाबत तपासणी करून कारवाई करणेचे शासनाच्या आदेशानुसार व पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार शाहुवाडी बसस्थानकासमोर ते वाहनांची तपासणी करत होते, त्यावेळी दि.१७/६/२०२३ रोजी रात्री आठ वाजता शाहुवाडी बस स्थानकासमोर घटना घडली, त्यावेळी बस स्थानकासमोरून आरोपी बजाज डिस्कव्हर एम.एच.०९सी.एन.९०४२ वरून मलकापूर कडून बांबवडेच्या दिशेने निघाला असता त्यांनी आरोपीस थांबवले, त्यावेळी आरोपीकडून दारूचा वास आलेने त्यांनी आरोपीची ब्रेथ ॲनालायझेरने तपासणी केली असता सदर तपासणीचा अहवाल पॉझीटीव्ह आला, त्यानंतर त्यांनी आरोपीस पोलीस ठाणेत घेवून आले, घटनेचे वेळी आरोपी दारू पिवून वेगाने गाडी चालवत असलेने आरोपीविरूध्द सरकारतर्फे त्यांनी नि.१८ अन्वये फिर्याद असून ब्रेथ ॲनालायझर रिपोर्ट नि.१९ वर आहे व त्यावर त्यांची व पो. कॉ. सुयश पाटील याची सही आहे. सदर आरोपीचा आरोपीचे वकिलांनी उलटतपास घेतला असता त्याने कथन केले की सदर कारवाईबाबत त्यांना लेखी आदेश नव्हता. साक्षीदाराने उलटतपासात पुढे कथन केले की शरीरातील दारूचे प्रमाण तपासणेसाठी व्यक्तीच्या रक्ताचे नमूने घ्यावे लागतात परंतू ब्रेथ ॲनालायझर मशीन असलेने रक्ताचे नमूने त्यांनी घेतले नाहीत. इतर विचारलेल्या सर्व उत्तरसूचक प्रश्नांची साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली.

८. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ३ दिपाली बाळू यादव या तपासी अधिकारी असून त्यांनी त्यांचे जबाबात कथन केले की सन २०२३ साली त्या पो. ठाणे शाहुवाडी येथे पो. नाईक पदावर कार्यरत असताना पो. कॉ. शिवाजी पाटील यांनी मोटार अपघाताविषयी कारवाई करून प्रस्तुत गुन्हा तपासासाठी नि.२४ वरील ठाणे अंमलदार यांचे आदेशाने

त्यांचेकडे वर्ग केला, त्यानंतर त्यांनी फिर्यादी व पंचांसमक्ष घटनास्थळी जावून नि.२५ अन्वये पंचनामा केला, तसेच त्यांनी ब्रिद ॲनालिसिस नि.१९ हस्तगत केला व आरोपीस कलम ४१अ प्रमाणे नि.२६ अन्वये नोटीस दिली. सदर आरोपीचा आरोपीचे वकिलांनी उलटतपास घेतला असता त्यांनी मान्य केले की सदर गुन्ह्याचा तपास त्यीन स्वत: कलेला नाही. साक्षीदाराने उलटतपासात पुढे मान्य केले की दारूचे सेवन करून वाहन चालवत असलेस रक्ताचे नमूने घेऊन तपासणी केली जाते, तसेच ब्रिथ ॲनालायझरद्वारे देखिल तपासणी करता येते. इतर विचारलेल्या सर्व उत्तरसूचक प्रश्नांची साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली.

९. अभियोग पक्षाने सदरकामी अन्य कोणत्याही साक्षीदारास तपासलेले नाही. अभियोग पक्षाचा घटनास्थळ पंचनामा पंच साक्षीदार क्र. १ याने अभियोग पक्षास साथ दिलेली नसून पंचनामा त्याचेसमक्ष केल्याची बाब पूर्णपणे नाकारली आहे. तसेच अभियोग पक्षाने सदरकामी पंचनामेवरील अन्य पंच साक्षीदार संजय रंगराव सोने यास तपासलेले नाही. सबब, घटनास्थळ पंचनामा शाबित झालेला नाही. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. २ व ३ यांनी जरी अभियोग पक्षास अनुकूल साक्ष दिली असली तरी दोन्ही साक्षीदारांनी कथन केलेप्रमाणे आरोपीवर ज्या ब्रिथ ॲनालायझर रिपोर्ट नि.१९ अन्वये कारवाई करणेत आली त्याचे अवलोकन केले असता त्यामधील सर्व मजकूर हा पुसट होवून मिटलेला असलेचे दिसून येते. सबब, सदर रिपोर्टवरून आरोपीने घटनेचे वेळी दारू पिऊन सदर दुचाकी चालविली हे स्पष्ट होत नाही. तसेच अभियोग पक्षाने नि.१९ वरील रिपोर्टला अनुसरून अन्य कोणताही वैद्यकीय पुरावा ज्यामधून आरोपीने घटनेचे वेळी दारू पिऊन सदर मोटरसायकल चालविली ही घटना शाबित होईल हा सादर केलेला नाही. तसेच अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीने घटनेचे वेळी त्याचे ताबेतील दुचाकी वाहन क्र. एम.एच.०९सी.एन.९९४२ हे हयगयीने, निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालविले ही बाब देखिल शाबित होत नाही. अभियोग पक्षाने सदरकामी अन्य कोणताही स्वतंत्र अथवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सदरकामी तपासलेला नाही. सबब, अभिलेखावरील पुरावा हा सुस्पष्ट व पेुरसा नसून आरोपीस सदरकामी सिध्ददोषी ठरविणेसाठी पुरेसा नाही. घटनास्थळ पंचनामा शाबित झालेला नाही. एकूणच, अपघाताची घटना घडली त्यावेळी अभियोग पक्षाचे कथनाप्रमाणे आरोपीने त्याचे ताबेतील तथाकथित बजाज डिस्कव्हर वाहन क्र. एम.एच.०९सी.एन.९०४२ हे अंमली पदार्थाचे सेवन करून भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविले ही बाब शाबित करणेसाठी आरोपीविरूध्द कोणताही संयुक्तिक पुरावा अभिलेखावर

दिसून येत नाही. एकूणच, आरोपीविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोपाबाबत त्यास सबळ पुराव्यानिशी निर्विवादपणे दोषी ठरविता येईल इतपत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर न आलेने आरोपीस सदरकामी दोषी ठरवता येत नाही व त्यास संशयाचा फायदा देण्यात येऊन निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त ठरते.

१०. सबब, अभियोग पक्षाचे अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीविरूध्दचा ठेवलेला गुन्हयाचा मजकुर हा शाबित होत नसलेने आरोपी प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब वर नमूद चर्चेस अनुसरून मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी असा नोंदवित आहे आणि मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी अरविंद दिनकर पोवार याची भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २७९ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८५ या गुन्हयातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**२.** आरोपीचा जामीनकदबा रदद करणेत येवुन त्यास सदर गुनह्यातून स्वांतत्र्य देण्यात येत आहे.

**३.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१अ प्रमाणे जामीन दयावा.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

Digitally signed by Pankaj Bhimrao Pawar

**स्थळ - शाहूवाडी**
**दिनांक – ०३/०६/२०२६**

**( पी. बी. पवार )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | P. A. Vasudeo |
| Name of Court | P. B. Pawar, C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi |
| Date of Dictation | 03/06/2026 |
| Judgment signed by the P.O.on | 03/06/2026 |
| Judgment uploaded on | 03/06/2026 |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते